**सामनेवाला यांचा उलटतपास : अर्जदारातर्फे श्री. एस. एस. विद्वांस वकील यांच्यामार्फत शपथेवर सुरू :**

4. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार यांना 75 तासाचा ओव्हरटाईम भत्ता देण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार यांचा 75 तासांपेक्षा जास्त मागणी केलेला ओव्हरटाईम भत्ता नामंजूर करण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि. 14/02/2018 रोजीच्या पत्राद्वारे अर्जदार यांना उर्वरीत ओव्हरटाईम भत्ता मंजूर करता येणार नाही असे कळविले आहे.

5. साक्षीदारास उलटतपासामध्ये नि. सी–34 वरील पान क्र. 198 अ.क्र. 39 रेग्युलेशन क्र. 20(i), (j), (k) या रेग्युलेशन संदर्भात लक्ष वेधण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, नि. सी–34 वरील पान क्र. 198 वरील अ.क्र. 39 रेग्युलेशन 20 (i), (j), (k) प्रमाणे (ii) प्रमाणे असणारी अधिकारीत व्यक्ती (Head of the Department) अस्तित्वात आहे. अर्जदार यांनी 75 तासापेक्षा जास्त ओव्हरटाईम भत्त्याची वेळोवेळी मागणी केलेली नाही त्यामुळे वेळोवेळी ओव्हरटाईम भत्त्याबाबत निर्णय अधिका–यांनी घेतलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ओव्हरटाईम भत्ता 75 तासाप्रमाणे ठरविण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे त्याची मागणी करण्याची आवश्यकता नाही. हे मी सांगू शकत नाही की, 75 तासापेक्षा जास्त केलेल्या ओव्हरटाईमचा भत्ता न देणे ही बाब बेकायदेशीर ठरत आहे. हे मी सांगू शकत नाही की, 75 तासापेक्षा जास्त ओव्हरटाईम केल्याबाबतचा भत्ता मागणी करण्याची जबाबदारी कामगाराची नाही व ती निश्चीत करण्याची जबाबदारी प्रशासनाची आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार यांचे 75 तासापेक्षा जास्त ओव्हरटाईम केल्याबाबतचे भत्ते नाकारल्याची प्रक्रिया बेकायदेशीर ठरत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

उलटतपास : संपुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by DATTATRAY SHANKARRAO KHEDEKAR
Date: 2026.03.07 15:28:07 +0530

LABOUR COURT MAHARASHTRA

**(द.शं.खेडेकर)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद

दिनांक–06/03/2026